महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक
MAHARASHTRA POST GRADUATE INSTITUTE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH MUHS, NASHIK
दिंडोरीरोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik – 422004
Tel : (0253) 2997296, Website : www.mpgimer.edu.in, E-mail : mpgi@muhs.ac.in
MUHS

डॉ.मृणाल पाटील
एम.बी.बी.एस., एम.डी.(नेत्र चिकित्सक).
अधिष्ठाता

Dr. Mrunal Patil
M.B.B.S. MD (Ophthalmology)
Dean

जा.क्र मआविवि/एमपीजीआय/लेखाविभाग/1006/२०२५

दिनांक:- 13/०८/२०२५

प्रति.

..........................
..........................
..........................

**दरपत्रक सुचना क्र.03./एमपीजीआय/२०२५-२६**

**विषय:** म.आ.वि.वि नाशिक अंतर्गत सुरु झालेल्या म.प.वै.शि.सं.संस्था, नाशिक येथील अधिष्ठाता कार्यालयाकरिता ऑफिस स्टेशनरीची खरेदी करणेसाठी दरपत्रके पुरवणे.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठांर्तगत " महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक." ही संस्था सध्या जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक यांचे आवारात कार्यरत आहे. सदर संस्थेच्या कार्यालयीन वापरासाठी सोबत तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विविध प्रकारच्या स्टेशनरीची (वस्तु/साहित्या) तात्काळ आवश्यकता असल्याकारणाने विविध पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

पुरवठा करावयाच्या स्टेशनरी/वस्तु/साहित्यांचा तपशिल व संख्या इत्यादींची माहिती सोबतच्या तक्त्यात नमुद करण्यात आलेली आहे. विनंती करण्यात येते की ***"अधिष्ठाता ,महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, मआविवि नाशिक - जिल्हा सामन्य रुग्णालय, नाशिक यांचे आवार, कान्हेरे मैदाना समोर त्र्यंबकरोड, नाशिक."*** यांचे नावाने/पत्त्यावर दि. २१/०८/२०२५ वेळ दुपारी ४.०० वाजेपावेतो सिलबंद दरपत्रके (तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा) असे दोन स्वतंत्र लिफाफे एका लिफाफयात मोहरबंद करुन सादर करावीत. दरपत्रकांच्या लिफाफयावर " म.प.वै.शि.व सं.संस्था नाशिक. करीता ऑफिस स्टेशनरी साहित्याचे दरपत्रक " असे नमुद करण्यात यावे. सदर दरपत्रके शक्य झाल्यास दि.२१/०८/२०२५ रोजी सायं ४.३० वाजता उपस्थित पुरवठेदारांसमोर दरपत्रके उघडण्यात येतील अथवा दरपत्रके उघडण्यासाठीची तारीख व वेळ पुरवठादारांस दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. दरपत्रकातील साहित्यांचे दर हे वाहातुकीसह व सर्व करांसहीत (GST) तसेच, म.प.वै.शि.व सं. संस्था नाशिक, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, नाशिक या ठिकाणी पोहोच करण्याचे असावेत. दरपत्रकावर आपला जीएसटी क्रमांक व दिनांक नमुद करण्यात यावा. (GST नोंदणी बंधनकारक आहे.)

(कृ.मा.प.)

**पुरवठयाच्या अटी व शर्ती :-**

१) एका पुरवठादाराने एकच दरपत्रक सादर कराव.

२) दरपत्रक फर्मच्या लेटरहेड वर किंवा लेटर हेड संगणकीय असल्यास फर्मच्या अधिकृत मोहर/शिक्का उमटवून सादर करावे.

३) दरपत्रक हे तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा अशी दोन वेगवेगळे लिफाफे एका मोठया लिफाफयात घालून वर नमुद केलेल्या सुचनेनुसार व पत्त्यावर विहित मुदतीत पोहोच करावी. मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

४) पुरवठेदाराने दरपत्रकासोबत तांत्रिक लिफाफयात - स्वतःचे/फर्मचे पॅनकार्ड, आधारकार्ड, शॉप ॲक्ट लायसन, संबंधित वस्तुचा अधिकृत पुरवठेदार/विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र (असल्यास), जीएसटी लागू नसल्यास त्याबाबत लेटरहेडवर प्रमाणित करुन मोहरबंद करावे. तसेच, व्यापारी लिफाफयात फक्त वस्तु/साहित्यांचे सर्व करांसह (जीएसटी) दर नमुद करुन मोहरबंद करावे. सदर दोन्ही मोहरबंद (तांत्रिक व व्यापारी) लिफाफे एका मोठया लिफाफयात घालून ते मोहरबंद करुन सादर करावे.

५) पुरवठा करावयाच्या वस्तू व साहित्य उच्च दर्जाच्या (Branded) आणि भारतीय बनावटीच्या (Made in India) असाव्यात.

६) वस्तुंचा दर्जा व पुरवठाराच्या शर्ती तपासून निर्णय होणार असल्याकारणाने निम्न दरपत्रक धारकास पुरवठा आदेश देणे बंधनकारक असणार नाही. वंस्तुचा दर्जा योग्य नसल्यास निम्न दरपत्रक नाकारण्याचा अधिकार म.प.वै.शि.व सं. संस्था, मआविवि नाशिक राखून ठेवत आहे.

७) वस्तु व साहित्य पुरवठयासाठी पुरवठेदारास कोणताही अग्रिम देण्यात येणार नाही.

८) वस्तु व साहित्यांच्या संख्येचे प्रमाण कमी-जास्त झाल्यास त्याप्रमाणे देयक अदा केले जाईल.

९) दरपत्रकात नमुद करण्यात आलेले स्टेशनरी / साहित्यांचे दर हे म.प.वै.शि.व सं. संस्था नाशिक, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, नाशिक या ठिकाणी पोहच करण्याचे असावेत. पुरवठेदाराने वाहतुकीचे स्वतंत्र दर नमुद करु नये. तसेच स्वतःच्या अटी व शर्ती नमुद करु नये.

१०) वस्तू व साहित्यांच्या पुरवठा केल्यानंतर व देयक सादर केल्यानंतर देयकाची अदायगी ही बॅंक खात्यात धनादेश किंवा त्ज्ळै द्वारे करण्यात येईल. त्यासाठी पुरवठेदाराने आपल्या बॅंक खात्याची पुर्ण माहिती देयकासोबत सादर करावी.

११) वरील दरपत्रक प्रक्रियेत बदल करण्याचा किंवा प्रक्रिया रदद करण्याचा अधिकार म.प.वै.शि.व सं.संस्था, मआविवि, नाशिक राखून ठेवत आहे.

१२) पुरवठादारांस व म.प.वै.शि.व सं.संस्था, मआविवि नाशिक, यांच्यात पुरवठयाबाबात काही वाद झाल्यास तो नाशिक जिल्हा यांच्या न्याय कक्षेत येईल.

अधिष्ठाता (अतिरिक्त कार्यभार)
(म.प.वै.शि.व सं.संस्था नाशिक)
Dean
Maharashtra Post Graduate Institute of Medical Education & Research MUHS Nashik

## म.प.वै.शि.व.सं.संस्थेतील आवश्यक असलेल्या स्टेशनरी साहित्य यादी

| अ. क्र. | वस्तुंचे नाव | लागणारी एकूण संख्या | दर प्रती नग रु. सर्व करांसहीत | एकूण किंमत रु. सर्व करांसहीत |
|---|---|---|---|---|
| 1 | बॉक्स फाईल मोठी | 200 नग | | |
| 2 | बॉक्स फाईल लहान | 150 नग | | |
| 3 | प्लॅट फाईल/ऑफिस फाइल - क्लिप/स्प्रिंग | 100/100 | | |
| 4 | आवक नोंदवही (१०० pages) | 40 नग | | |
| 5 | जावक नोंदवही (१०० pages) | 40 नग | | |
| 6 | रेजिस्टर १ क्वायर | 84 नग | | |
| 7 | रेजिस्टर २ क्वायर | 84 नग | | |
| 8 | रेजिस्टर ३ क्वायर | 84 नग | | |
| 9 | रेजिस्टर ४ क्वायर | 84 नग | | |
| 10 | स्टॅपलर मोठे (Kangaroo) | 20 नग | | |
| 11 | स्टॅपलर लहान (Kangaroo) | 40 नग | | |
| 12 | स्टॅपलर पिन मोठी | 80 बॉक्स | | |
| 13 | स्टॅपलर पिन लहान | 100 बॉक्स | | |
| 14 | कटर मोठे | 50 नग | | |
| 15 | पेन्सिल (नटराज) | 100 नग | | |
| 16 | पेन्सिल शार्पनर | 50 नग | | |
| 17 | पेन्सिल रबर | 60 नग | | |
| 18 | पेन निळा | 200 नग | | |
| 19 | पेन लाल | 100 नग | | |
| 20 | नोट पॅड (२० pages) | 150 नग | | |
| 21 | स्टॅम्प पॅड मोठे | 30 नग | | |
| 22 | ५ कलर पेपर रिम (५००पाने) लाल पिवळा निळा हिरवा तांबडा | 5 रिम | | |
| 23 | पेपर रिम (५०० पाने) B 2 B | 100 रिम | | |
| 24 | मांजरपाट कापड (पांढरे मीटरमध्ये) | 350 मीटर | | |
| 25 | कात्री लहान (१८ सेमी) | 40 | | |
| 26 | यु पिन बॉक्स | 35 बॉक्स | | |
| 27 | टाचणी बॉक्स | 35 बॉक्स | | |
| 28 | पिन बॉक्स | 50 नग | | |
| 29 | व्हाईटनर | 30 नग | | |
| 30 | गम बॉटल ५०० ml camal | 50 | | |
| 31 | सेलोटेप पांढरा / खाकी | 25/25 नग | | |
| 32 | हायलायटर | 50 नग | | |
| 33 | मार्कर पेन | 60 नग | | |
| 34 | पर्मनंट मार्कर पेन | 50 नग | | |
| 35 | प्लास्टिक फोल्डर A4 with clip | 300 नग | | |
| 36 | कलर फलॅग ४ रंगी | 60 नग | | |
| 37 | डस्टबिन लहान | 50 नग | | |
| 38 | फुट पट्टी १२ इंच | 40 नग | | |
| 39 | सॉफ्ट बोर्ड ३x२ फुट | 2 नग | | |
| 40 | व्हाईट बोर्ड ३x२ फुट | 5 नग | | |
| 41 | नोटीस बोर्ड ३x४ फुट | 1 नग | | |
| 42 | नोटीस बोर्ड ३x२ फुट | 2 नग | | |

पुरवठादाराचे नाव शिक्का व स्वाक्षरी